जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महाराष्ट्र टाईम्स 03 JUN 2016

## मराठी विभागप्रमुखपदी प्रा. डॉ. राजन गवस



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागप्रमुखपदी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. राजन गवस यांची नियुक्ती करण्यात आली. डॉ. कृष्णा किरवले हे निवृत्त झाल्यानंतर गवस यांची या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. गवस यांच्या अनेक कादंबऱ्या, कवितासंग्रह, ललित साहित्य प्रसिध्द झाले आहे. चौंडकं, भंडारभोग, धिंगाणा, कळप, ताणवट, ब बळीचा अशा त्यांच्या अनेक कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. याशिवाय 'रिवणावायली मुंगी', 'आपण माणसात जमा नाही' हे कथासंग्रह प्रसिध्द आहेत. 'तणकट' ला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला असून अनेक राज्य पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Times of India 3 JUN 2016

# University gets nod to modernise exam processes

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The examination department of the Shivaji University, Kolhapur (SUK), will soon have an end-to-end computer system which will look to eliminate various irregularities.

According to the decision of the management council on May 27, all work of the department will soon be carried out on end-to-end computer systems. The examination department mostly relies on conventional methods for all its examination work, before, during and after.

SUK controller of examination Mahesh Kakade stressed on the all encompassing aspects of the new system. "The end-to-end integrated exam management system can manage the entire operation of examinations. It will include all procedures from student registration to issuing of hall tickets, question banks and question paper bank generation, secure delivery of question papers, optical mark recognition and bar code technology in answer sheets, digital scanning and on screen evaluation, online application for re-evaluation, and degrees and certificates," he said.

He added the state government had set up a high-level committee headed by information technology secretary Rajesh Agarwal on August 1, 2012, following rampant irregularities and many cases of question papers leaking. "After the committee submitted its report on October 5, 2012, it was decided to implement the entire report," said Kakade.

The official also said that the emphasis of the committee report was on the effective use of information and communication technology for the managing examinations conducted by universities to usher in greater efficiency, transparency and reliability.

He added that SUK is already using the secured remote paper delivery (SRPD) system which was suggested in the committee report.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
लोकमत 3 JUN 2016

# विद्यापीठ करणार कागदाचा पुनर्वापर

कोल्हापूर : दैनंदिन वापरातून निर्माण झालेला रद्दी कागद एकत्रित करून त्याचा पुनर्वापर करण्याचा निर्णय शिवाजी विद्यापीठाने घेतला आहे. त्यासाठी विद्यापीठाकडून 'पर्यावरण मित्र' ही संकल्पना राबविण्यात येणार आहे, अशी माहिती प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली. सध्या विद्यापीठात रद्दीचा कागद कचऱ्याच्या टोपलीत टाकण्यात येतो. नाही तर कचरा जाळला जातो. यातून प्रदूषण होते. ते टाळण्यासाठी निरुपयोगी कागदपत्रांचा कचरा हा 'पर्यावरण मित्र' असा उल्लेख असलेल्या पेटीमध्ये बारीक तुकडे करून टाकावयाचा आहे. तो एकत्रित करून लगद्यासाठी परीक्षा विभागाशी करार झालेल्या कागदाच्या ठेकेदाराकडे पाठविण्यात येणार आहे. त्यातून कागदाचा पुनर्वापर केला जाणार आहे. (प्रतिनिधी)

सकाळ
3 JUN 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'पर्यावरण मित्र'तून कागदाचा पुनर्वापर

## 'सेव्ह पेपर - सेव्ह एन्व्हायन्मेंटद्वारे कागदाच्या कमी वापरासाठी विद्यापीठाचे पाऊल

कोल्हापूर, ता. २ : शिवाजी विद्यापीठातर्फे पर्यावरण संवर्धनअंतर्गत कागदाच्या वापराबाबत 'पर्यावरण मित्र' ही संकल्पना राबविण्यात येत असून कागदाचा पुनर्वापर करण्यात येणार आहे. निरुपयोगी कागदपत्रांचा कचरा कचऱ्याच्या टोपलीत न टाकता 'पर्यावरण मित्र' पेटीत बारीक तुकडे करून टाकण्यासह अन्य सूचना सर्व अधिविभागांना दिल्या आहेत. 'सेव्ह पेपर - सेव्ह एन्व्हायन्मेंट' या उक्तीप्रमाणे विद्यापीठ कागदाचा कमीत कमी वापर व्हावा, यासाठी आदर्शवत पाऊल टाकत आहे.



### त्यानंतर बाटल्यांची विल्हेवाट

केमिकलचा वापर करून रिकाम्या झालेल्या केमिकल बॉटल व ब्रोकन ग्लासवेअरच्या विक्रीसाठी दर करार झालेला आहे. सर्व विभागांनी रंगीत व पारदर्शक काचसाहित्य वेगळे साठवून ठेवावे व ठेकेदारामार्फत पुनर्वापरासाठी पाठविण्यासाठी कार्यवाही करणे आवश्यक आहे. पुरेसा साठा झाल्यानंतर भांडार विभागास कळवून काचसाहित्य व बाटल्यांची विल्हेवाट लावायची आहे.



कार्यालयात दैनंदिन कामकाजासाठी कागदाचा वापर केला जातो. यात निर्माण होणारा रद्दी कागद कचऱ्याच्या टोपलीत टाकण्यात येतो. हा कचरा जाळला जातो. यात पर्यावरणाचे प्रदूषण तर होतेच, तसेच नवीन कागद निर्माण करण्यासाठी वृक्षतोड सातत्याने सुरू राहते. या बाबीवर लक्ष केंद्रित करून पर्यावरण मित्र ही संकल्पना राबविण्यात येत आहे. मोहिमेतील सहभागाचा प्रशासकीय गुणवत्ता अभियानाच्या मूल्यांकनात विचार केला जाणार आहे. त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या उपाययोजनेची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्या अंतर्गत कोणताही महत्त्वाचा कागद कचरा म्हणून टाकला जाणार नाही, याची दक्षता घ्यायची आहे. कागदपत्रांचा कचरा सर्व विभाग व अधिविभागांनी एकत्रित करून लगद्यासाठी कागद परीक्षा विभागाशी करार झालेल्या ठेकेदाराकडे पाठविण्याबाबत नियोजन करण्याचे आहे. यामुळे कागदाचा पुनर्वापर होईल. कागदाचा वापर कमीत कमी प्रमाणात करून कचऱ्याच्या माध्यमातून देखील कमी कागद पुनर्वापरासाठी जाईल, याची दक्षता घेण्याबाबत कार्यवाही करण्याची जबाबदारी विभागांवर राहील.

## डॉ.अकल्पीता अरविंदेकर



डॉ. अकल्पीता अरविंदेकर यांचे पूर्ण शिक्षण त्यांचे मूळ गाव बेळगाव येथे झाले आहे. सध्या त्या कोल्हापुरात स्थायीक आहेत. त्यांनी एम. एस्सी. बायो केमिस्ट्री विषयात पूर्ण केली आहे. तर १९९३ ला पीएच. डी. पदवी घेतली आहे. तर त्या विद्यापीठात १९८९ पासून बायोकेमेस्ट्री विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली १० विद्यार्थ्यांनी पीएच. डी. केली आहे. गेल्या १५ वर्षापासून डायबेटीसवरील आयुर्वेदिक औषधांवर संशोधन सुरू आहे. हे औषध तयार होण्याच्या मार्गावर आहे. या औषधाला पेटंट मिळण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवणार आहेत.

## डॉ. सुमन बुवा



डॉ. सुमन बुवा यांचे मूळ गांव निंगुडगे (ता. आजरा, जि. कोल्हापूर) आहे. त्यांनी शिवाजी विद्यापीठातून बी कॉम, एम. एस डब्ल्यू, पी. जी. डिप्लोमा इन प्रौढ निरंतन शिक्षण, समाजकार्य विषयातून पीएच. डी. केली आहे. प्रौढ आणि निरंतन विभागामध्ये १९९२ पासून प्राध्यापक म्हणून रूजू आहेत. त्यांनी विविध स्तरातील महिला सबलीकरणासाठी वाड्या वस्त्यावर जाऊन कार्य केले आहे. तसेच सामाजिक कायदे, महिलांविषयीचे कायदे यांची माहिती महिलांना दिली आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर ३५ शोधनिबंध प्रसिध्द झाले आहेत. त्यांना सामाजिक कार्यामध्ये आवड आहे.

## डॉ. डी. के. गायकवाड



डॉ. डी. के. गायकवाड हे मूळचे वलगुड (ता. उस्मानाबाद, जि. सोलापूर)चे आहेत. त्यांचे सर्व शिक्षण शिवाजी विद्यापीठातून झाले आहे. त्यांनी १९८८ ला एमएस्सी पदवी तर १९९५ ला पीएच. डी. पदवी संपादन केली. तर वारणा महाविद्यालयामध्ये १९८८ ते २००६ पर्यंत विभागप्रमुख म्हणून कार्यरत होते. २००६ ला शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यभार स्वीकारला. २००९पासून असोसिएट प्रोफेसर म्हणून कार्यरत आहेत. २०१४ मध्ये ४ महिने विभागप्रमुख म्हणून कार्यभार स्वीकारला होता. त्यांच्या मार्गदर्शनाखाली १२ विद्यार्थ्यांनी पीएच. डी. पदवी पूर्ण केली आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांनी ४० संशोधन प्रबंध सादर केले आहेत. ३२ कार्यशाळांमध्ये सहभाग नोंदवला आहे. २००७ पासून एनएसएस विभागप्रमुख कार्यरत आहेत. एनएसएसचा त्यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट कार्यक्रम समन्वयक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत
2 JUN 2016

# विद्यापीठात डॉ. राजन गवस यांच्यासह चार विभागप्रमुखांनी स्वीकारला कार्यभार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील मराठी, वनस्पतीशास्त्र, प्रौढ आणि निरंतर शिक्षण विभाग, बायोकेमेस्ट्रि या चार विभागातील सेवानिवृत्त विभागप्रमुखांनी दुसऱ्याकडे विभागाचा कार्यभार दिला. मराठी विभागप्रमुखपदी डॉ. राजन गवस, प्रौढ आणि निरंतर शिक्षण विभागप्रमुखपदी डॉ. सुमन बुवा, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुखपदी डॉ. डी. के. गायकवाड तर बायोकेमेस्ट्री विभागप्रमुखपदी डॉ. अकल्पीता अरविंदेकर यांची निवड झाली आहे. सर्वच नूतन विभागप्रमुखांनी कार्यभार स्वीकारला.



## डॉ. राजन गवस

डॉ. राजन गवस यांचे मूळ गाव गारगोटी (कोल्हापूर) आहे. त्यांचे शिक्षण एम. ए. मराठी, एम. एड., एम. फिल. पी. एच. डी. शिवाजी विद्यापीठातून केली आहे. प्राध्यापक म्हणून शिवाजी विद्यापीठात कार्यरत होते. त्यांनी चौंडक, भंडारभोग, धिंगाणा, कळप, ताणवट, ब, बळीचा नावाच्या कादंबऱ्या. तर रिवणावायली मुंगी, आपण माणसात जमा नाही, ढव्ह आणि लख्ख ऊन या कथा. कविता संग्रह, ललित साहित्य प्रसिध्द केले आहे. तसेच त्यांनी अनेक कादंबऱ्यांचे समीक्षण आणि कथांचे संपादन केले आहे. बांधकाम कामगारांच्या बोलीचा अभ्यास, सीमा भागातील मराठी बोलीचा अभ्यास, लैंगिक लोककथांचा अभ्यास, महाविद्यालय मराठीच्या अध्यापनाची उद्दीष्ट्ये, तृतीयपंथीयांची बोली या विषयावर संशोधन केले आहे. तसेच त्यांना महाराष्ट्र शासनानाचे म. सा. प. पुणेचा शंकर पाटील पुरस्कार, भंडारभोग, ग. ल. ठोकळ पुरस्कार भंडारभोग, भैरू रतन दमाणी–तणकट, विखे पाटील पुरस्कार–कळप, पु. ना. पंडीत पुरस्कार– आपण माणसात जमा नाही, रत्नाप्पा कुंभार समाजभूषण पुरस्कार– ब, बळीचा, महेश निकम पुरस्कार–ब, बळीचा, त्र्यं. स. कुल्ली पुरस्कार– ब, बळीचा, ना. धो. महानोर पुरस्कार– ब, बळीचा, ना. धो. महानोर पुरस्कार– ब, बळीचा, बंडा गोपाल पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. महाराष्ट्रभर त्यांची साहित्यिक, लेखक म्हणून ख्याती आहे.

Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 JUN 2016

# Varsity keen on CAP for UG courses

Piyush.Bhusari
@timesgroup.com

**Kolhapur:** Shivaji University is considering a centralised admission procedure (CAP) for undergraduate courses.

D R More, director, Board of College and University Development at Shivaji University, Kolhapur (SUK), said on Wednesday that the university will discuss the possibility at a formal meeting with stakeholders.

More had promised to look into the matter during a discussion with various students' bodies last week.

"The university, no doubt, favours the centralised admission process, but it is the colleges who grant admissions to their institutes. They need to be convinced that CAP will revolutionise the overall admission scenario in higher education," said More.

More added that since students bodies have raised the issue, he has asked them to first convince colleges about the possibility of CAP in their institutes for first-year admissions. "We can hold a formal meeting with principals once they all agree to discuss the issue," he said.

According to More, there are about 12-13 colleges in the city so first-year admission through CAP can be managed easily. "Most colleges are for science while a modest number offer commerce and few colleges have seats for arts. I think implementing CAP here for undergraduate courses will be feasible only for the science stream," he said.

More added that at present, all colleges carry out their own admissions. CAP, which will be restricted to city colleges, might streamline the UG admissions system, he said.

The director also mentioned that 10 years ago when it was decided to hold CAP for Class XI, institutes were not very receptive. "However, the decision was accepted majority of the junior colleges and now one cannot imagine Class XI without the CAP," he said.

## POST-GRADUATE ENTRANCE TEST RESULTS LIKELY TODAY

Results for the entrance tests for postgraduation courses held by Shivaji University have been delayed by one day and will be announced on Thursday

Shivaji University, Kolhapur (SUK), which held entrance tests for admission to 41 postgraduation courses in May, was supposed release the results on Wednesday. The varsity did not inform students about any delay either.

SUK controller of examinations (COE) Mahesh Kakde attributed the delay to some conflicts in the data. "We are working on it and it is quite likely the result will be announced on Thursday without any glitches. The data is ready and only needs to be updated accordingly," he said.

When asked about the possible disruption in the overall schedule due to the results being delayed, Kakade said acting registrar V N Shinde would know all necessary details. Shinde, however, was not available for comment despite frequent attempts.

According to an earlier scheduled issues by the university, the merit list for all entrance examinations was to be declared on June 1, while discrepancies could be reported till June 4. The final merit list will be announced on June 8.

The first round of admissions, as per the original schedule, was to begin on June 10, the second from June 16 and the third from June 22.

Amit Vaidya, district president of the Akhil Bhartiya Vidyarthi Parishad (ABVP) said the university did not inform students about the delay despite having access to the Internet and other facilities. "The university should have informed students about the delay on its website. We think the overall schedule should be delayed accordingly to give students some breathing space to adjust to the new dates," he said.

A candidate who appeared for the MSc entrance test said the university should have announced results following proper procedures since students have to track their chances of admission in other universities as well. TNN

# विद्यापीठाने वेगळी ओळख दिली : एस. आर. यादव

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने मला वेगळी ओळख दिली. विद्यापीठातील घटकाने केलेल्या सहकार्यामुळे वनस्पतीशास्त्राच्या माध्यमातून विद्यापीठ, देशासाठी काम करण्याची संधी मिळाली. समृद्ध मनाने निवृत्त होत असल्याचा मोठा आनंद आहे, असे प्रतिपादन विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. आर. यादव यांनी येथे केले.

सेवानिवृत्तीनिमित्त विद्यापीठातर्फे डॉ. यादव यांचा कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते मंगळवारी विद्यापीठाचे स्मृतिचिन्ह व शाहू चरित्र पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहातील कार्यक्रमास प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे उपस्थित होते.

डॉ. यादव म्हणाले, ३१ वर्षांच्या सेवेत संशोधन व विकासासाठी १५ कोटींचा निधी आणला. त्यातून विद्यापीठ परिसराचा विकास केला. पाच पुस्तकांचे लेखन केले. त्यासह देशात विद्यापीठाची ओळख निर्माण करणारे वनस्पती वर्गीकरण केंद्र, लीड बोटॅनिकल गार्डनची उभारणी केली. हे काम विद्यापीठातील प्रत्येक घटकाने केलेल्या सहकार्यामुळे शक्य झाले. विद्यापीठाने संधी दिल्याने वनस्पतीशास्त्रज्ञ, संशोधक म्हणून जागतिक पातळीवर वेगळी ओळख मिळाली. सेवानिवृत्त झालो तरी एक विद्यार्थी म्हणून काम करणार आहे.

कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, माणूस असल्याचा गौरव विद्यापीठात काम करताना लाभतो. विद्यापीठातील शिक्षक, कर्मचारी यांच्याकडील प्रेम, आपुलकीला तोड नाही.

सेवानिवृत्तीनिमित्त मराठी विभागाचे प्रा. डॉ. के. आर. किरवले, प्रौढ आणि निरंतर शिक्षण विभागाचे डॉ. जी. एन. कांबळे, पदार्थविज्ञान विभागातील डॉ. एस. डी. लोटक, सहायक कुलसचिव के. जी. माने, सहायक अधीक्षक एस. बी. सुतार, शिक्षकेत्तर कर्मचारी जी. ई. वारके, अर्जुन मिठारी, शिवाजी मेटके यांचा कुलगुरु डॉ. शिंदे यांच्या हस्ते सत्कार झाला. यावेळी प्रा. एस. एस. कांबळे, सुरेश पाटील, सुरेश बंडगर, दत्तात्रय चव्हाण उपस्थित होते. (प्रतिनिधी)



शिवाजी विद्यापीठात मंगळवारी वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. एस. आर. यादव यांचा सेवानिवृत्तीनिमित्त कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी महेश काकडे, डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

### विद्यापीठाला अशीही भेट

विद्यापीठातील सांडपाण्याच्या पुनर्वापरातून ग्रंथालय व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुतळ्याभोवतीच्या उद्यानाचे अर्जुन मिठारी यांनी पुनर्जिवन केले. त्यांची इच्छा होती की, भूगोल विभागामागील आंब्याची बाग पुनरुज्जीवित व्हावी. त्याच्या पूर्ततेसाठी सेवानिवृत्तीच्या कार्यक्रमात त्यांनी आंब्याची १०१ रोपे कुलगुरु डॉ. शिंदे यांच्याकडे दिली.

# वनस्पती संशोधक : प्रा. डॉ. एस. आर. यादव



**शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख, आंतरराष्ट्रीय दर्जाचे संशोधक प्रा. डॉ. एस. आर. यादव आज (ता. ३१) ३४ वर्षांच्या सेवेनंतर सेवानिवृत्त होत आहेत. यानिमित्ताने...**

श्रीरंग रामचंद्र यादव हे मूळचे कऱ्हाड तालुक्यातील साईकडे या गावचे. प्राथमिक शिक्षण गावातच पूर्ण झाल्यानंतर हायस्कूलचे शिक्षण तळमावले हायस्कूलमध्ये पूर्ण केले. सकाळी दहा वाजेपर्यंत शेतात काम करूनच त्यांना अनवाणी शाळेत जावे लागे. लहानपणापासूनच स्वभाव जिद्दी व कष्टाळू असल्याने अडचणींवर मात करीतच त्यांनी हायस्कूलपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. सायन्सबाबत आवड असल्याने अकरावी पास झाल्यानंतर कऱ्हाडच्या सायन्स कॉलेजमध्ये प्रवेश घेतला.

बारावीला ६० टक्के गुण मिळाले. मेडिकल कॉलेजला प्रवेश मिळत असतानाही आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना त्याच कॉलेजमध्ये बीएस्सीसाठी प्रवेश घ्यावा लागला. वनस्पतीशास्त्र विषयाची फारशी आवड नसतानाही इतर मित्रांनी प्रवेश घेतला म्हणून त्यांनी वनस्पतीशास्त्र विषय निवडला आणि १९७५ मध्ये प्रथम श्रेणीत बीएस्सी पदवी मिळवली. पुढे मुंबई विद्यापीठातून एमएस्सी वनस्पतीशास्त्र पदवी प्राप्त केली.

१९८३ मध्ये 'भारतातील औषधी वनस्पतींचा पर्यावरणीय अभ्यास' या विषयावर डॉक्टरेट पदवी संपादन केली. सन १९८२ ते १९८४ या कालावधीत त्यांनी अलिबाग येथील महाविद्यालयात व नंतर १९८४ ते १९८५ या कालावधीत मुलुंड येथील वझे-केळकर कॉलेजमध्ये वनस्पतीशास्त्र विषयाचा प्राध्यापक म्हणून नोकरी केली.

डॉ. यादव १ जून १९८५ रोजी शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागात प्राध्यापक म्हणून रुजू झाले. संशोधनासाठी तसेच आवड म्हणून भरपूर निसर्गभ्रमंती केल्यामुळे त्यांच्या मनात पश्चिम घाटातील वनस्पती विविधता ठसली होती आणि वनस्पती वर्गीकरणशास्त्र हेच आपले यापुढील जीवित कार्य आहे, असे समजून त्यांनी जोमाने संशोधन कार्यास सुरवात केली. सन १९९३ ते १९९५ या कालावधीत त्यांना गोवा विद्यापीठात प्रपाठक व विभागप्रमुख म्हणून काम करण्याची संधी मिळाली. त्यानंतर परत शिवाजी विद्यापीठात प्रोफेसर पदावर ते रुजू झाले. सन २००२ मध्ये डॉ. यादवांना दिल्ली विद्यापीठात बोलावणे आले. विविध अनुभव प्राप्त करण्यासाठी त्यांनी सन २००२ ते २००५ या तीन वर्षांत दिल्ली विद्यापीठात प्रोफेसर म्हणून आपल्या शैक्षणिक व संशोधन कार्याचा ठसा उमटविला. डॉ. कुलकर्णी यांच्या आग्रहाखातर व पश्चिम घाटातील वनसंपदेच्या आकर्षणामुळे डॉ. यादव पुन्हा शिवाजी विद्यापीठात कार्यरत झाले. १ जून २०१३ पासून डॉ. यादव यांनी वनस्पतीशास्त्र विभागप्रमुखपदाचा कार्यभार स्वीकारला व आज (३१ मे) ते सेवानिवृत्त होत आहेत.

डॉ. एस. आर. यादव यांनी आजअखेर राष्ट्रीयं, आंतरराष्ट्रीय स्तरावर २०५ रिसर्च पेपर, सहा पुस्तके व २५ विज्ञान लेख प्रसिद्ध केले आहेत. सुमारे १२० राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरांवरील सेमिनार व कॉन्फरन्सला उपस्थित राहून त्यांनी १८० रिसर्च पेपर सादर केले आहेत. डॉ. यादवांना देशातील व परदेशातील २८ कॉन्फरन्सना लीड लेक्चरसाठी निमंत्रित करण्यात आले होते. या उपक्रमातून त्यांनी जपान व अमेरिका या देशांना भेटी दिल्या आहेत.

डॉ. यादवांच्या मार्गदर्शनाखाली आजअखेर ११ विद्यार्थ्यांनी एम.फिल. व २६ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केल्या आहेत. त्यांनी नऊ राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरांवरील कॉन्फरन्सचे आयोजन केले आहे. वनस्पती वर्गीकरणशास्त्रात डॉ. यादव यांचा हातखंडा आहे. डॉ. ए. आर. कुलकर्णी आणि मराठवाडा विद्यापीठाचे (कै.) डॉ. व्ही. एन. नाईक यांच्या विचारांचा पगडा डॉ. यादवांच्यावर दिसून येतो.

डॉ. यादवांनी आजअखेर तब्बल ५४ नवीन वनस्पतींच्या जाती - प्रजाती शोधल्या आहेत, ज्या जगासाठी, विज्ञानासाठी नवीन आहेत. डॉ. यादव यांच्या संशोधन कार्याचा गौरव म्हणून संशोधक विद्यार्थ्यांनी यादव सरांच्या सन्मानार्थ तीन नवीन वनस्पती प्रजातींना डॉ. श्रीरंग यादवांची नावे दिली आहेत. यापैकी दोन प्रजाती गवताच्या व एक कडधान्याच्या कुळातील आहे.

पश्चिम घाट, तसेच भारतातील इतर प्रदेशांतील अनेक दुर्मिळ, संकटग्रस्त व महत्त्वाच्या वनस्पती व वृक्षांच्या जतनासाठी डॉ. यादवांनी विद्यापीठात लीड बॉटनिकल गार्डन उभारली आहे, जी महाराष्ट्रातील एकमेव समृद्ध वनस्पती उद्यान आहे आणि डॉ. यादवांच्या वनस्पती वर्गीकरणशास्त्राच्या संशोधनातील एक जिवंत प्रतिकृती आहे.

**- प्राचार्य डॉ. मधुकर बाचूळकर**

महाराष्ट्र टाईम्स 3 1 MAY 2016
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बोटॅनिकल गार्डन उभारल्याचा आनंद



शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागाप्रमुख **डॉ. एस. आर. यादव** नामवंत वनस्पती तज्ज्ञ म्हणून ओळखले जातात. त्यांच्याच पुढाकाराने विद्यापीठात लीड बॉटेनिकल गार्डन साकारले. डॉ. यादव ३१ मे रोजी सेवानिवृत्त होत आहेत. यानिमित्त त्यांच्याशी साधलेला संवाद...

## टॉक-टाइम

**■ शैक्षणिक प्रवास ते विद्यापीठापर्यंतच्या प्रवासाकडे कसे पाहता?**

साईकडे (ता. पाटण, जि. सातारा) हे माझे जन्मगाव. माझे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण काकासाहेब चव्हाण हायस्कूलमध्ये शिक्षण झाले. त्यानंतर सायन्स कॉलेज, कराड येथे पदवीपर्यंत शिक्षण झाले. मुंबई विद्यापीठाची एमएससी व पीएचडी पदवी मिळाली. डॉक्टरेट मिळाल्यानंतर अलिबाग येथील जे. एस. एम. कॉलेजमध्ये सहाय्यक प्राध्यापक म्हणून रूजू झालो. त्यानंतर मुलूंडच्या वझे कॉलेजमध्ये अध्यापन केले. तिसाव्या वाढदिवसादिवशी म्हणजे १ जून, १९८५ ला शिवाजी विद्यापीठात प्राध्यापक म्हणून कार्यरत झालो. मधल्या काळात गोवा विद्यापीठ, दिल्ली विद्यापीठ येथेही काम करण्याची संधी मिळाली.

**■ अभ्यासाचा मुख्य विषय आणि पीएचडी चा विषय कोणता होता?**

वनस्पतीचे वर्गीकरण हा अभ्यसाचा मुख्य विषय आहे. सध्या देशातील विविध प्रजाती, त्यांचे नामकरण व वर्गीकरण या विषयावर अभ्यास सुरू आहे. 'औषधी वनस्पती व त्यांचे संगोपन' या विषयात पीएचडी केली. सशोधनातूनच फ्लोरा ऑफ कोल्हापूर डिस्ट्रीक्ट (कोल्हापूर जिल्ह्यातील सपुष्प वनस्पती), ग्रासेस ऑफ महाराष्ट्रा (महाराष्ट्रातील गवते) यासह सहा संशोधनपर ग्रंथ लिहिले आहेत.

**■ वनस्पतीशास्त्र विभागाने बॉटेनिकल गार्डन विकसित केले आहे. त्याविषयी...**

तीस वर्षांपूर्वी म्हणजे येथे रूजू झाल्यापासून बॉटेनिकल गार्डनचे काम सुरू केले होते ते निवृत्तीच्या वर्षी या उद्यानाला पुर्णत्व आले. नानाविध प्रकारच्या वनस्पतींचे सवंर्धन करणारे हे उद्यान देशातील एकमेव असे आहे. प्राध्यापक, विद्यार्थ्यांना वनस्पतींचा सर्वांगीन अभ्यास करता यावा यासाठी लीड बॉटेनिकल गार्डनची कल्पना सुचली. विद्यापीठाने परिसरातील सहा एकर जागा दिली. ती जागा साफ करून विविध प्रजातींच्या वनस्पतींची लागवड केली. हे उद्यान उभारताना अर्थात रोप लागवडीसाठी व देखभालीसाठी निधी अल्प प्रमाणात विद्यापीठ देत होते. काम मोठे होते आणि पैसा कमी होता. म्हणून प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी रोपांसाठी खड्डे खणले, माती भरली. त्यांचे संगोपन केले. त्या रोपांना रोज नवीन फुटणाऱ्या पानाबरोबरच कामाचा उत्साह वाढायचा. या उत्साहात अनेकविध वृक्षांच्या प्रजाती लावलेल्या आहेत. सध्या या उद्यानात ११३० प्रजाती आहेत. आम्ही काम केले याचे श्रेय आम्हाला मिळत गेले. एक तर ही रोपे मोठी होऊन उद्यानाला मूर्त रूप आले आणि याचबरोबर देश पातळीवर याची दखल घेतली गेली. केंद्र स्तरावरील तज्ज्ञांनी या उद्यानाला भेट देऊन काही कोटी रूपये निधी दिला. येथील विद्यार्थ्यांना या उद्यानाचा संशोधनासाठी उपयोग होतोच शिवाय देशातील, परदेशातील विद्यार्थी येथे संशोधनास येत असतात. ज्या हेतूने हे उद्यान उभारले तो हेतू साध्य होत असताना मनस्वी आनंद होत आहे.

**■ पश्चिम घाट वाचविण्यासाठी कोणते प्रयत्न केले गेले आहेत?**

पश्चिम घाटातील अनेक संकटग्रस्त वनस्पतींचे या उद्यानात संवर्धन केले आहे. पश्चिम घाटातील जवळ जवळ ३० प्रजातीच्या वनस्पती या उद्यानात वाढवून परत पश्चिम घाटात त्याचे रोपन केले आहे.

**● भारतभूषण गिरी**

# वनस्पती विविधता जतन करणारा संशोधक

श्रीरंग रामचंद्र यादव हे मूळचे कऱ्हाड तालुक्यातील साईकडे या गावचे. अशिक्षित, गरीब शेतकरी कुटुंबातील चार भावंडांपैकी एक. प्राथमिक शिक्षण गावातच पूर्ण झाल्यानंतर हायस्कूलचे शिक्षण तळमावले हायस्कूलमध्ये पूर्ण केले. विज्ञानाबाबत आवड असल्याने अकरावी पास झाल्यानंतर कऱ्हाडच्या सायन्स कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. कष्टाने, जोमाने अभ्यास केल्याने त्यांना बारावीला ६० टक्के गुण मिळाले. मेडिकल कॉलेजला प्रवेश मिळत असतानाही आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना त्याच कॉलेजमध्ये बी. एस्सी.साठी प्रवेश घ्यावा लागला. वनस्पतीशास्त्र विषयाची फारशी आवड नसतानाही इतर मित्रांनी प्रवेश घेतला म्हणून त्यांनी वनस्पतीशास्त्र विषय निवडला आणि १९७५ मध्ये प्रथम श्रेणीत बी.एस्सी., तर मुंबईतील रुईया कॉलेजमधून १९७७ मध्ये एम.एस्सी. वनस्पतीशास्त्र पदवी प्राप्त केली. त्याच काळात प्रा. डॉ. ए. आर. कुलकर्णी यांचा त्यांना भक्कम आधार लाभल्यामुळे त्यांच्या मनात वनस्पती विविधतेच्या अभ्यासाबाबत अधिक आवड निर्माण झाली आणि त्यांनी कुलकर्णी सरांच्या मार्गदर्शनाखाली पीएच. डी.साठी संशोधन कार्यास सुरुवात केली. चार-पाच वर्षे रिसर्च फेलो म्हणून काम केले आणि १९८३ मध्ये 'भारतातील औषधी वनस्पतींचा पर्यावरणीय अभ्यास' या विषयावर डॉक्टरेट पदवी संपादन केली. १९८२ ते १९८४ या कालावधीत त्यांनी अलिबाग येथील महाविद्यालयात व नंतर १९८४ ते १९८५ या कालावधीत मुलुंड येथील वझे-केळकर कॉलेजमध्ये वनस्पतीशास्त्र विषयाचे प्राध्यापक म्हणून नोकरी केली.



शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख, आंतरराष्ट्रीय दर्जाचे संशोधक प्रा. डॉ. एस. आर. यादव ३४ वर्षांच्या सेवेनंतर आज-मंगळवारी सेवानिवृत्त होत आहेत, यानिमित्ताने...

डॉ. यादव दि. १ जून १९८५ रोजी शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागात प्राध्यापक म्हणून रुजू झाले. संशोधनासाठी तसेच आवड म्हणून भरपूर निसर्गभ्रमंती केल्यामुळे त्यांच्या मनात पश्चिम घाट प्रदेशातील वनस्पतीची विविधता ठसली होती आणि वनस्पती वर्गीकरणशास्त्र हेच आपले यापुढील जीवितकार्य आहे, असे समजून त्यांनी जोमाने संशोधन कार्यास सुरुवात केली. १९९३ ते १९९५ या कालावधीत त्यांना गोवा विद्यापीठात प्रपाठक व विभागप्रमुख म्हणून काम करण्याची संधी मिळाली. त्यानंतर परत शिवाजी विद्यापीठात प्रोफेसर पदावर ते रुजू झाले. २००२ मध्ये डॉ. यादव यांना दिल्ली विद्यापीठात बोलावणे आले. विविध अनुभव प्राप्त करण्यासाठी त्यांनी २००२ ते २००५ या तीन वर्षांत दिल्ली विद्यापीठात प्रोफेसर म्हणून आपल्या शैक्षणिक व संशोधन कार्याचा ठसा उमटविला. त्यानंतर डॉ. कुलकर्णी यांच्या आग्रहाखातर व पश्चिम घाटातील वनस्पतीसंपदेच्या आकर्षणामुळे डॉ. यादव पुन्हा शिवाजी विद्यापीठात कार्यरत झाले. दि. १ जून २०१३ पासून डॉ. यादव यांनी वनस्पतीशास्त्र विभागप्रमुखपदाचा कार्यभार स्वीकारला.

डॉ. यादव यांनी आजअखेर राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर २०५ संशोधन निबंध, सहा पुस्तके व २५ विज्ञान लेख प्रसिद्ध केले आहेत. सुमारे १२० राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरांवरील सेमिनार व कॉन्फरन्सना उपस्थित राहून त्यांनी १८० शोधनिबंध सादर केले आहेत. डॉ. यादव यांना देशातील व परदेशातील २८ कॉन्फरन्सना लिड लेक्चरसाठी निमंत्रित करण्यात आले होते. या उपक्रमातून त्यांनी जपान व अमेरिका या देशांना भेटी दिल्या आहेत.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली आजअखेर ११ विद्यार्थ्यांनी एम.फिल. व २६ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केल्या आहेत. त्यांनी नऊ राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरांवरील कॉन्फरन्सचे आयोजन केले आहे. वनस्पती वर्गीकरणशास्त्रात डॉ. यादव यांचा अभूतपूर्व हातखंडा आहे. डॉ. ए. आर. कुलकर्णी आणि मराठवाडा विद्यापीठाचे कै. डॉ. व्ही. एन. नाईक यांच्या विचारांचा पगडा डॉ. यादव यांच्यावर दिसून येतो. डॉ. यादव यांनी आजअखेर तब्बल ५४ नवीन वनस्पतींच्या जाती, प्रजाती शोधल्या आहेत, ज्या जगासाठी, विज्ञानासाठी नवीन आहेत. डॉ. यादव यांच्या संशोधनकार्याचा गौरव म्हणून संशोधक विद्यार्थ्यांनी यादव सरांच्या सन्मानार्थ तीन नवीन वनस्पती प्रजातींना डॉ. श्रीरंग यादव यांचे नावे दिले आहे. यापैकी दोन प्रजाती गवतांच्या व एक कडधान्याच्या कुळातील आहे.

डॉ. यादव यांनी २६ रिसर्च प्रोजेक्टस् पूर्ण केले असून, त्यांनी या प्रोजेक्टस्मधून विविध संस्थांकडून सुमारे अठरा कोटी रुपये अनुदान विद्यापीठास प्राप्त करून दिले आहेत. डॉ. यादव यांच्या या कार्याबाबत त्यांना १९९९ मध्ये शिवाजी विद्यापीठाने 'आदर्श शिक्षक' पुरस्कार देऊन सन्मानित केले होते. तसेच त्यांना फेलो ऑफ आयएएटी, फेलो ऑफ नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्स, फेलो ऑफ महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ सायन्स हे सन्मान मिळाले आहेत. त्यांना इतरही चार राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. आयएएटी संस्थेचे डॉ. शिवराजन सुवर्णपदक, इंडियन बॉटनिकल सोसायटीचे डॉ. महेश्वरी सुवर्णपदक तसेच असोसिएशन ऑफ प्लॉन्ट टेक्सानॉमी या संस्थेचे डॉ. सांतापू सुवर्णपदक देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

पश्चिम घाट, तसेच भारतातील इतर प्रदेशांतील अनेक दुर्मीळ, संकटग्रस्त व महत्त्वाच्या वनस्पती व वृक्षांच्या जतनासाठी डॉ. यादव यांनी विद्यापीठात लिड बॉटनिकल गार्डन उभारली आहे, जे महाराष्ट्रातील एकमेव समृद्ध वनस्पती उद्यान आहे आणि डॉ. यादव यांच्या वनस्पती वर्गीकरणशास्त्राच्या संशोधनातील एक जिवंत प्रतिकृती आहे. डॉ. एस. आर. यादव यांच्या सर्व महान कार्यास माझा नम्र सलाम !

**- प्राचार्य डॉ. मधुकर बाचूळकर**

जनसंपर्क कक्ष
लोकमत 31 MAY 2016 शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात 'फार्मास्युटिकल मायक्रो बायोलॉजी' अभ्यासक्रम

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात एम. एस्सी. फार्मास्युटिकल मायक्रो बायोलॉजी हा नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास विद्यापीठाच्या विद्या परिषदेने सोमवारी मान्यता दिली.

विद्यापीठ कार्यालयात कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली विद्या परिषदेची बैठक झाली. सचिवपदी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. विद्यापीठाच्या हिंदी विभागामध्ये एम. ए. भाषा प्रौद्योगिकी, संगणक तथा भारतीय भाषा संगणक प्रणाली अनुप्रयोग पदविका हे अभ्यासक्रम सुरु करण्यास व्यवस्थापन परिषदेस



शिफारस करण्यास मान्यता दिली. सन २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षांच्या कालावधीतील विद्यापीठाचा नवीन शैक्षणिक बृहत आराखडा मान्य करण्यात आला. विद्यापीठात एम. एस्सी. फार्मास्युटिकल मायक्रो बायोलॉजी हा नवीन अभ्यासक्रम विज्ञान शाखेतून हॉरिझोंटल मोबॅलिटीअंतर्गत सुरु करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यास मान्यता देण्यात आली. महाविद्यालयांकडून प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने प्रयोगशाळा मान्यता, प्राथमिक संलग्नीकरण, नूतनीकरण, नैसर्गिक विस्तार व निरंतर संलग्नीकरणास मान्यता दिली. विविध विद्याशाखेतंर्गत चॉईस बेस्ड क्रेडिट सिस्टीम पद्धतीनुसार विविध अभ्यासक्रमांचे सुधारित करावयाची रचना, अभ्यासक्रम व समकक्ष विषय प्रश्नपत्रिका स्वरुप या अभ्यासक्रमांना दुरुस्तीसह मान्यता देण्यात आली. (प्रतिनिधी)

# १४ हजार विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ



Maruti.Patil
@timesgroup.com

**कोल्हापूर :** दुष्काळ परिस्थिती लक्षात घेऊन ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफीचा निर्णय राज्य सरकारने जाहीर केला होता. निर्णयाचा फायदा शिवाजी विद्यापीठ संलग्नीत कॉलेजमधील १४ हजार ३३१ विद्यार्थ्यांना झाला आहे. राज्य सरकारने विद्यार्थ्यांचे ८९ लाख ७३ हजार २९८ रुपयांचे परीक्षा शुल्क माफ केले आहे. ही रक्कम शिक्षण विभागाकडून विद्यापीठाला मिळाली आहे. याचा सर्वाधिक फायदा सांगली आणि सातारा जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त गावांतील विद्यार्थ्यांना झाला आहे.

२० ऑक्टोबर २०१५ रोजी राज्य सरकारने दुष्काळग्रस्त गावांची यादी प्रसिद्ध केली होती. त्यानुसार सांगली जिल्ह्यातील ३६३, सातारा ३४३ व कोल्हापूर जिल्ह्यातील सात गावांचा समावेश होता. ज्या गावात खरीप हंगामातील आणेवारी ५० पैशापेक्षा कमी आहे, अशा गावातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफीचा निर्णय जाहीर केला होता. या निर्णयानुसार परीक्षा विभागाने अशा विद्यार्थ्यांची माहिती मागवली होती.

पारंपरिक अभ्यासक्रमाच्या १३ हजार विद्यार्थ्यांना ६९ लाख तर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या एक हजार विद्यार्थ्यांना १९ लाखांचे शुल्क माफ झाले आहे. कॉलेजकडून प्राप्त झालेली यादी शिक्षण सहसंचालक कार्यालयाला दिली होती. विद्यापीठाने माफ केलेली शुल्करक्कम शिक्षण सहसंचालकाकडून मिळाली आहे.

## पदव्युत्तर विद्यार्थ्यांना फटका

परीक्षा फी माफीचा निर्णय सर्व शैक्षणिक संस्थेतील सर्वच अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना लागू होत होता. यानुसार विद्यापीठ आणि विद्यापीठ संलग्न महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना लाभ मिळणे आवश्यक होते. मात्र संबंधित कॉलेज आणि विभागाणी विद्यापीठाकडे फी माफीची यादीच सादर केली नसल्याने पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या एकाही विद्यार्थ्याला योजनेचा लाभ मिळू शकला नाही.

| शाखा | विद्यार्थी संख्या | शुल्क माफ रकम |
|---|---|---|
| पारंपरिक अभ्यासक्रम | १३,९५९ | ६९,७९,५०० |
| व्यावसायिक अभ्यासक्रम | १,३७२ | १९,९३,७९८ |
| एकूण | १४,३३१ | ८९,७३,२९८ |

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महाराष्ट्र टाईम्स 31 MAY 2016

# विद्यापीठाचा बृहत आराखडा मंजूर

**कोल्हापूर :** पुढील पाच वर्षांच्या कालावधीत विद्यापीठाचा नवीन शैक्षणिक बृहत आराखडा शिवाजी विद्यापीठाच्या विद्या परिषदेच्या बैठकीत मान्य करण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे होते. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. बैठकीत एमएस्सी फार्मास्युटीकल मायक्रोबायोलॉजी हा नवीन अभ्यासक्रम सायन्स फॅकल्टीमधून हॉरिझोंटल मोबॅलिटी अंतर्गत सुरू करण्याबाबत परिषदेस शिफारस करण्यास मान्यता देण्यात आली.

बैठकीत २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षांच्या कालावधीच्या नवीन शैक्षणिक बृहत आराखडा मान्य करण्यात आला. विद्यापीठाच्या हिंदी विभागामध्ये एमए भाषा प्रौद्योगिकी व संगणक तथा भारतीय भाषा सॉफ्टवेअर्स अनुप्रयोग पदविका हे अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत व्य परिषदेस शिफारस करण्यात आली आहे. विविध अभ्यासक्रमांचे सुधारित स्ट्रक्चर, अभ्यासक्रम व समकक्ष विषय प्रश्नपत्रिका स्वरुप या अभ्यासक्रमांना दुरुस्तीसह मान्यता देण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरूण भारत 31 MAY 2016

# नवीन शैक्षणिक बृहत आराखड्यास मान्यता

**कोल्हापूर :** सन २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षांच्या कालावधीतील विद्यापीठाचा नवीन शैक्षणिक बृहत आराखडा मान्य करण्यात आला. हा निर्णय शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी झालेल्या विद्यापरिषदेच्या बैठकीत झाला. सचिवपदी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. विद्यापीठाच्या हिंदी अधिविभागामध्ये एम. ए. भाषा औद्योगिकी व संगणक तथा भारतीय भाषा सॉफ्टवेअर्स अनुप्रयोग पदविका हे अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यास मान्यता देण्यात आली. विविध विद्याशाखेंतर्गत सी. बी. सी. एस. पद्धतीनुसार विविध अभ्यासक्रमांचे सुधारित करावयाचे स्ट्रक्चर, अभ्यासक्रम व समकक्ष विषय प्रश्नपत्रिका स्वरूप या अभ्यासक्रमांना दुरूस्तीसह मान्यता देण्यात आली. विविध महाविद्यालयांकडून प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने प्रयोगशाळा मान्यता, प्राथमिक संलग्नीकरण, नूतनीकरण, नैसर्गिक विस्तार व निरंतर संलग्नीकरणास मान्यता देण्यात आली. विद्यापीठामध्ये एम. एस्सी. फार्मास्युटीकल मायक्रोबायोलॉजी हा नवीन अभ्यासक्रम सायन्स फॅकल्टीमधून हॉरिझोंटल मोबॅलिटी अंतर्गत सुरू करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यास मान्यता देण्यात आली.

पुढारी

3 1 MAY 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठातून

# नवीन शैक्षणिक बृहत आराखड्यास मान्यता

कोल्हापूर : प्रतिनिधी

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ या पाच वर्षाच्या कालावधीसाठी विद्यापीठाच्या नवीन शैक्षणिक बृहत आराखड्यास शिवाजी विद्यापीठ विद्या परिषदेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

विद्यापीठ विद्या परिषदेची बैठक सोमवारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सचिवपदी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. बैठकीत विविध विषयांवर निर्णय घेण्यात आले. विद्यापीठाच्या हिंदी अधिविभागात एम.ए.भाषा प्रौद्योगिकी व संगणक तथा भारतीय भाषा सॉफ्टवेअर्स अनुप्रयोग पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यास व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यास मान्यता देण्यात आली.

विविध विद्याशाखांतर्गत सी.बी.सी.एस.पद्धतीनुसार अभ्यासक्रमांचे सुधारित करावयाचे स्ट्रक्चर, अभ्यासक्रम व समकक्ष विषय प्रश्नपत्रिका स्वरूप या अभ्यासक्रमांना दुरुस्तीसह मान्यता देण्यात आली. विविध महाविद्यालयांकडून प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने प्रयोगशाळा मान्यता, प्राथमिक संलग्नीकरण, नूतनीकरण, नैसर्गिक विस्तार व निरंतर संलग्नीकरणास मान्यता देण्यात आली.

विद्यापीठात एम.एस्सी.फार्मास्युटिकल मायक्रोबायोलॉजी हा नवीन अभ्यासक्रम सायन्स फॅकल्टीमधून हॉरिझोंटल मोबॅलिटीअंतर्गत सुरू करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यास मान्यता देण्यात आली.